# गोष्ट सांगतेय ऐका

गिरिजा कीर

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**गोष्ट सांगतेय ऐका : गिरिजा कीर**

**© गिरिजा कीर**
५, झपुर्झा, साहित्य सहवास,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१
संपर्क : २६५९०८८२

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
नोव्हेंबर, २०१२

**किंमत**
रुपये १६०/-

# अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १. | माझा अभिमन्यू झालाय | ... | ७ |
| २. | १० मे, १९६८ | ... | १५ |
| ३. | अंधारातली लकेर | ... | २७ |
| ४. | ए पोरी, जरा मागं बघ | ... | ३६ |
| ५. | फुलवाला उत्तर हवंय | ... | ५२ |
| ६. | हाजी अल्लीचा नाका | ... | ६४ |
| ७. | खुळा गऽ बाई माझा ! | ... | ७३ |
| ८. | निदान दोन अश्रू | ... | ८६ |
| ९. | माझा साहित्यसंसार | ... | ९८ |
| १०. | व्यथाफूल | ... | १०७ |
| ११. | बेसमेंट | ... | ११७ |
| १२. | थोडा उशीर झाला | ... | १२४ |
| १३. | सर्दी, खोकला ते लव्हेरिया | ... | १३१ |
| १४. | शाप | ... | १४८ |
| १५. | माझा खेळ मला मांडू दे | ... | १५९ |

✦ ✦

## आभार

या कथा ज्या ज्या अंकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत त्या संपादकांचे आभार !

## महत्त्वाची सूचना

या पुस्तकातली कोणतीही कथा, जाहीर वा खाजगीत कुठेही सांगावयाची झाल्यास, रु. ५०/- (पन्नास रुपये) मानधन देऊन लेखिकेची आगाऊ परवानगी घेणे कायद्याने बंधनकारक राहील.

**गिरिजा कीर**
५, झपूर्झा, साहित्य सहवास,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१
संपर्क- २६५९०८८२

# माझा अभिमन्यू झालाय

आयुष्यात काही काही प्रश्नांना उत्तरं सापडतच नाहीत. 'असं का घडलं?' याचं उत्तर कुणीच कुणाला देऊ शकलं नाहीय. कदाचित तेही माझ्यासारखेच भोवऱ्यात सापडले असतील किंवा नको त्या झंझटात सापडणं, असा शहाणपणाचा विचार करून बाजूला होत असतील. काही का असेना, मी त्या प्रश्नांचीच कथा केलीय. अशासाठी की आता तरी मला खरी उत्तरं मिळू शकतील. नाही का?

तुम्ही म्हणाल, कसले प्रश्न? आणि तुम्हाला कशाची उत्तरं हवीयत? तर तेच सांगतेय ना ! नीट ऐका–

वेळूचं बन जिथून सुरू होतं तिथं एस. टी. आली आणि ड्रायव्हरनं कचकन् ब्रेक दाबला. 'सुंदरबन कोणाय, सुंदरबन' कंडक्टरनं पुकार केला. बॅग आणि पर्स सांभाळत मी उतरले. धुरळा ओकत एस. टी. निघून गेली.

दुपारी दोनचं रखरखीत ऊन. उन्हाची काहिली आणि धुरळा. माझ्या डोळ्यांत पाणी साकळलं. डोळे टिपत, घाम पुसत मी दूरवर नजर टाकली. सगळं चिडिचिप्प होतं. लाल रंगाची गाडी मला न्यायला येणार होती. गाडीचा आवाज तर येत नव्हता. पण आणखी कसला तरी... कसला? मी मागं वळून कानोसा घेतला–

अरे, तिथं सुंदर वेळूचं बन पसरलं होतं. तो ध्वनी यंत्राचा नव्हता आणि माणसांच्या चाहुलीचा तर नव्हताच नव्हता. बांबू आणि वारा यांचा जो खेळ चालला होता, त्यातून तो ध्वनी उमटत होता. किती छान वाटत होतं ! आजवर मी नुसतीच ऐकत आले होते; अशी वाऱ्याची शीळ घुमते म्हणून ! पण ती इतकी-इतकी मधुर ! आपल्याला वेड लागल्यागत होतं आणि मग आपण तिच्या मागून जात राहतो.

खरंच सांगते, मला वाटलं, त्या मोरपीसवाल्या सावळ्याला हाक मारावी-

'कन्है...' पण तो आपल्याला साद देईल? खरंच तो येईल? मोरपीस लावलेला, बासरी खोचलेला, आपल्या केवळ अस्तित्वानं चराचराला वेड लावणारा... मी कार्यक्रमाला आलेय, मला न्यायला लाल रंगाची गाडी येणाराय, हे सगळं विसरून मी खुळावल्यासारखी थेट त्या वेळूच्या बनात शिरले. केसांतून भाग निघावा तशी सरळ स्वच्छ पायवाट समोर दिसत होती. वाऱ्याचा स्पर्श घेत, शीळ अंगांगात भरून घेत मी चालत राहिले. कुठं चालले होते मी? ठाऊक नाही. काय शोधत होते? मला वाटतं, बहुतेक मी स्वत:लाच शोधत होते.

आता दूरवर एक लाल कौलारू घर दिसत होतं. मी थेट त्या टोकापर्यंत पोचले. ते घर मोठं दिमाखदार होतं. नाव, 'गुलमोहर' त्याची साक्ष पटवणारा गुलमोहर, अंगा-खांद्यावर फुलांचे झुबके मिरवत उभा होता. मी क्षणभर तिथंच थबकले. जावं, न जावंच्या गुंत्यात अडकले. तेवढ्यात कुणीसं विचारलं, 'कोणाय?'

मला चटकन् उत्तर सुचेना. त्या आवाजासरशी एक गोष्ट लक्षात आली, मी चुकीच्या ठिकाणी पोचलेय. मी बोलून गेले, 'मी मुंबईहून आलेय. आज माझा इथं कार्यक्रम आहे.'

मालकीणबाई एकदम पुढे आल्या. 'म्हणजे तुमची चुकामूक झाली वाटतं? कंपनीची गाडी केव्हाच गेलीय. हे ड्रायव्हर लोक ना, असेच. आता रेस्ट हाऊसमध्ये न उतरता आमच्याकडेच राहा. आम्हालाही ऐटीत सांगता येईल...' बाई बोलतच होत्या. मी त्यांच्या पाठोपाठ आत शिरले. बाहेरच्या हॉलमध्ये मोठा झोपाळा होता. तो रिकामाच, मागेपुढे हेलकावे घेत होता. मी तिथं टेकले. नोकरानं गार पन्हं आणून दिलं. त्याचा पहिला घोट घेतानाच जाणवलं, मी खूप चाललेय आणि दमलेयसुद्धा. नोकरानं बॅग आत नेली. गेस्टरूममध्ये माझी व्यवस्था केली होती.



'तुम्ही फ्रेश व्हा. थोडंसं खाऊन, कॉफी घेऊन रेस्ट घ्या. रात्री बाई जेवणाची व्यवस्था करतीलच. मी कंपनीत कळवलंय.' एवढं सांगून बाई आत निघून गेल्या. चारच्या सुमाराला दार वाजलं. 'आपण कुठं बाहेर चाललात का?' मी विचारलं, 'होय. अहो आमची मुलगी शहरात असते. तिचं उद्या गॅदरिंग आहे. तिनं नाटकात काम केलंय. मग नाटक बघायला, आई-बाबा हवेत ना ! सॉरी हं, तुमचं कथाकथन ऐकायला मी नाही. पण तुमची व्यवस्था केलीय. गर्दी खूप होईल हो ! आमचं खेड असलं तरी माणसं रसिक आहेत.'

'बरं झालं तुम्ही आलात. अहो मी काळजीत होते. आमच्या सासूबाई आजारी आहेत. म्हणजे गेली पाच-सहा वर्षं त्या अंथरुणावरच आहेत. कुठं जायचं म्हटलं तर मुळी सुटकाच नाही. समजा आम्ही गेलो आणि इकडं काही झालं, मग? लोक म्हणतील, सुनेला आणि मुलाला पर्वाच नाही.'

'तुम्ही घाबरू नका हो. तसं काही व्हायचं नाही.'

'तेवढं कुठलं आमचं भाग्य ! अगदी राशीवर आल्यायत. आयाबाई ठेवलीय त्यांच्यासाठी. रात्री दहापर्यंत तुम्ही याल कार्यक्रम आटोपून. तुमच्या जिवावर चाललेय हो !' खाली हॉर्न वाजला आणि बाई बडबडायची थांबली एकदाची. ती गेली आणि मी मोठ्ठा श्वास टाकला. एकूण घराचं रंग-रूप लक्षात आलं. सासू-सुनेचं भांडण हा विषय, कल्पांतापर्यंत न संपणारा. म्हटलं कथाकथन आटोपून, जेवून मग सासूला निवांत भेटू. तिचीही काही बाजू असेलच की !

रात्री साडे दहाला परतले. आले ती तरंगत तरंगतच. तेवढ्यात कामवाल्या आयानं मला भानावर आणलं. 'हा कागद. त्यावर औषधाच्या वेळा आहेत. रात्रीला त्यांना कपभर दूध आणि ब्रेडचा एकच स्लाईस द्या. मॅडम उद्या अकरापर्यंत येतील. मी सकाळी आठपर्यंत येईन. तोवर सांभाळा. तशीच गरज पडली तर हा हॉस्पिटलचा नंबर. खाली डॉक्टरचा मोबाईल नंबर. मी चालले. आधीच तुमच्यामुळं लेट झालाय.' मालकिणीच्या तालमीत तयार झालेली आया, त्याच रुबाबात बोलली आणि बाहेर पडली. मी दाराला कडी लावली. हात-पाय धुऊन कपडे बदलले. एकेक पायरी चढत वरच्या मजल्यावर गेले. आता मला एकदम जाणवलं, त्या एवढ्या मोठ्या घरात, फक्त अंधारच माझ्या सोबतीला होता.

उजव्या हाताची दोन नंबरची खोली. मी दाराशी पोचले. आत झीरो पॉवरचा अशक्त दिवा सोबत करत होता. तिथं कॉटवर एक हडकुळा, आकारहीन देह

विसावला होता. हात-पाय असं काही स्वतंत्र जाणवतच नव्हतं. उशीवर डोकं नावाचा अवयव विसावला होता. त्यावर पिकलेल्या केसांच्या झिरमिळ्या. उभट नाक. त्याच्या दोन बाजूला ताणलेले गाल. दाट काळसर वर्तुळात खोल गेलेले डोळे. त्या फिकट उजेडात मी तपशील टिपत होते. 'कोण?' एक खोल गेलेला घोगरट आवाज अंधाराला छेद देत गेला.

मी. मी म्हणजे कोण? कुणाची कोण? त्या देहाची कोण?

या 'मी'ला, त्या देहाइतकं देखील अस्तित्व नव्हतं.

'सिस्टर-' त्याच आवाजाची हाक. मी सिस्टर नव्हते, पण काठीसारखा तो हात मला खुणावत होता. काय करू? माझे पाय जमिनीला चिकटल्यागत झाले. जाऊ पुढे? काय विचारेल ती? आणि मी काय उत्तर देऊ? मी कथाकथन करायला आलेय असं सांगू?

कसली कथा? कुणाची कथा? आयुष्याची एक कादंबरी मला जणू हाकारत होती- लिहितेस ना? लिही माझ्यावर. या निरुपयोगी, शुष्क देहावर. तिनं केव्हातरी या मुलाला जन्म दिलाय. या सुनेला कुंकवाच्या पावलांनी घरात आणलीय. त्यांना कुणाला माझ्यासाठी आता वेळ नाही गं ! त्यांचं जग वेगळं आहे. माझ्या जगातला सूर्य कधीच मावळलाय... मी एवढा वेळ माझ्याशीच विचार करत होते- तिचं मन होऊन ! 'सिस्टर, प्लीज इकडे येतेस?' मी भानावर आले. भीत भीत तिच्या अंथरुणाशी गेले. ती मला सिस्टर समजली होती. 'मला भूक... मला दूध देतेस?'

मी दूध गरम केलं. त्यात थोडी साखर टाकली. पावाच्या स्लाईसची कडा काढली. तो दुधात भिजवून तिच्या तोंडाशी नेला. माझ्या लक्षात आलं, खाताना तिला त्रास होतोय. मी हळूच तिचं डोकं माझ्या मांडीवर ठेवलं. एक लहानसा घास भरवला. ती मुकाट खात होती. चमच्यानं हळूहळू तिला दूध पाजलं. 'नवी सिस्टर?' तिनं विचारलं. मी होकार भरला. माझ्या हातावर आपला हडकुळा हात ठेवत ती म्हणाली,

'चांगली आहेस. मला... आणखी एक, एकच तुकडा दे.' ती नाही म्हणते.

'डॉक्टरांनी जेवढं सांगितलंय ना तेवढंच देते.'

'खोटं, खोटं बोलते. डॉक्टरला सांगते, हिची भूक मेलीय. मला भूक लागते. तुझी आण. बायो, मला खाऊ घाल गं ! पुण्यवान होशील.' माझा गळा दाटून



आला. ती बोलू शकत होती. खात होती. आणखी मागत होती. मी काय करू? आणखी देऊ? आणि म्हातारीचं काही बरं-वाईट झालं तर?

तिला आता थोडी हुशारी आली होती. माझ्याकडं बघून ती फिकटसं हसली. म्हणाली, 'घाबरू नकोस. मी मरत नाहीय. देव एवढा दयाळू नाही. माझं पुण्याचं मापटं अजून भरलं नाहीय. मला जरा बसती कर.'

लोडाला टेकवून मी तिची मान थोडी उभार केली. एका बाजूनं माझ्या हाताचा टेकू दिला.

'देतेस? एक तुकडा-' तिच्या डोळ्यांत काय नव्हतं? अवघ्या ब्रह्मांडाची भूक 'आ' वासून माझ्याकडे पाहात होती. विचारत होती, 'मला देतेस, एक तुकडा...?' मला वाटलं, मोठ्यानं गळा काढून रडावं. जास्तीचं खाऊन ती उद्या गेली तर मी काय उत्तर देऊ? आणि न खाता उपाशीच मेली तर...? स्वत:ला कोणती शिक्षा देऊ? जमीन दुभंगून या क्षणाला मला पोटात घेईल तर किती बरं होईल, पण असं घडत नाही. जे घडतं ते हे मृत्यू आणि भूक !

मी स्वत:शीच काही ठरवलं. आत गेले. फ्रीजमधून थोडं दूध घेतलं. कपाटात ब्रेड होता. त्यातला एक स्लाईस घेतला. दूध गरम केलं. साखर टाकली. दुधात पावाचे लहान तुकडे टाकले. तिला लोडाला टेकवून झोपवली. चमच्यानं हळू भरवत राहिले. खाऊन झाल्यावर तिचं तोंड पुसलं. नीट झोपवली. तिच्या चेहऱ्यावर आता टुकटुकी आली होती. माझ्याकडे एकटक बघत ती म्हणाली, 'मला गोष्ट सांगतेस?'

गोष्ट ! हिला गोष्ट सांगू? कसली? दुष्काळाची? खून-मारामारीची? घटस्फोटाची? प्रेमिकांची? दु:खाची? आनंदाची? अरे हिला मी काय सांगू? हिनं मला ओळखलं होतं का? या अशा स्थितीत? हा माझ्या कथेचा जय, की माझी कसोटी?

'सांगतेस? गोष्ट !'

'हो. सांगते. कुणाची सांगू? श्रीकृष्ण-द्रौपदीची?'

'नको.'

'राम-सीतेची?'

'नको, नको.'

'मग-'

'माझी गोष्ट सांग. मी आजारी नाही. वर्षानुवर्षं उपाशी आहे. मी यांना नको आहे. कुणालाच नको आहे. कुणालाच नको असलेल्या बाईची गोष्ट. सांगतेस?'

मी सांगायला लागले. कोण्या एके काळी बंगालमध्ये दुष्काळ पडला होता. लोक गवत खाऊ लागले. रस्त्या-रस्त्यात भुकेपोटी आक्रंदत लोळू लागले...

रात्रीच्या त्या शांत वेळी त्या वृद्धेला थोपटत, तेव्हा ऐकलेलं एक गाणं हळू बारीक आवाजात गुणगुणू लागले-

'देश बंगाल भुकाऽऽ
ऐका, ही घोर विलापिकाऽऽ'

ती गाढ झोपी गेली होती. छातीचा भाता वरखाली होत होता. श्वास जाणवत होता. पाऊल न वाजवता मी माझ्या खोलीत गेले. तिला दिव्याची सोबत ठेवून.

सकाळी आठच्या आत मला हे घर सोडायचं होतं. ती जागी होण्यापूर्वी. आया येण्यापूर्वी. मी माझी बॅग उचलली आणि खोलीबाहेर पडले. अरे, पण हे काय? काल इथल्याच जिन्यानं मी वर आले होते. तो जिना कुठं गेला? मी बाहेर कुठून कशी पडू?

समोर एक दालन होतं. विशेष म्हणजे एवढ्या सकाळी पाच-सहा बायका गंभीर चेहऱ्यानं काहीतरी बोलत होत्या. त्यांना खाली जायचा मार्ग विचारावा म्हणून मी दोन पावलं दाराच्या दिशेनं टाकली आणि थबकलेच. वर्तुळात मध्ये बसलेली बाई जोरजोरात विचार मांडत होती,

'आपण काहीतरी केलं पाहिजे. शेतकरी आत्महत्या करतायत. त्यांची मुलंबाळं भुकेपोटी मरतायत. कर्जाचा डोंगर त्यांना गिळून टाकतोय. अरे हे नादान सरकार काय करतंय? आपण जंगी मोर्चे काढू. निषेध करू. तिकडच्या लोकांना कळवा, शक्ती-प्रदर्शनाची हीच वेळ आहे. चला, उठा-'

मी मध्येच बोलले, 'बाजूच्याच खोलीत एक वृद्धा भुकेमुळं कासावीस झालीय. तिची जबाबदारी घ्या. तिला वाचवा.'

'आम्ही व्यक्तीचा विचार करत नाही, समष्टीचा करतो.' बाईचं तडफदार उत्तर.

'पण व्यक्ती-व्यक्ती मिळूनच समष्टीचे प्रश्न निर्माण होतात ना? मूळ-' मला अडवत तिनं विचारलं,

'तुम्ही कोणत्या पक्षाच्या?' खडा सवाल.



'मी, 'जगवा आणि जगू द्या' पक्षाची. मी माणूस जाणते.'

'दार लावून घ्या गं ! आपल्याला मूर्खांशी बोलायला वेळ नाही. आपल्याला संघटना जगवायचीय. एक म्हातारी मेली काय, अन्...' दार बंद झालं. मी जिना शोधण्यासाठी पुढे सरकले. तिथून एक नवं दालन लागत होतं. त्या दालनात अनेक तरुण बसले होते. केस पिंजारलेले, दाढीचे खुंट वाढलेले. चेहरे रापट. कपडे धुळीनं भरलेले. मी सावधपणे दाराशीच थांबले. ऐकू लागले. कुजबूज चालली होती. 'कुठून आणायच्या नोकऱ्या? सरकार म्हणतं, शिका. हे समाजकार्य करणारे संभावित, म्हातारपणी उद्योग नाही म्हणून आम्हाला पकडून नेतात. वसतिगृहात ठेवतात. शिकवतात. एस. एस. सी. पासचा शिक्का पडला की लाथ मारून बाहेर घालवून देतात. जा लेको आणि करा काय? ३७% मार्क. नोकरी कोण देणार? तुमचा नाना?'

'साला त्यांच्यावर का उखडतोस? पाच वर्षं फुक्कट जेवण तर दिलं ! कपडालत्ता दिला.'

'हो ! आणि स्वत:ला समाजात, 'कार्यकर्ते' म्हणवून घेतलं. पुरस्कार मिळवले. आमचं काय हो?'

'मी एक सुचवू? आपण सामूहिक आत्महत्या करूया का? म्हणजे प्रश्न मिटेल.'

'आत्महत्या? म्हणजे संपलं की रे. त्यापेक्षा एखाद्या राजकीय पक्षात जाऊया. कुणाच्या पण नावानं जय ! पोटाचा प्रश्न मिटेल. लोकल लीडर म्हणून गावात वचक. शिवाय पैसे पण येतात इकडून-तिकडून.'

'म्हणजे खंडणी?'

'तू काय कोण सद्‌गुरू काय लेका? सरकार म्हणजे तरी काय? आपलंच ना ! जनतेचा पैसा. या खिशातला त्या खिशात. याला चोरी म्हणत नाहीत. याला 'व्यवस्थापन' असं नाव आहे.'

तरुण बेकारांची भाषा ऐकली. विचार ऐकले. यांचं पुढं काय होणार? यांना कुणी मार्ग का दाखवत नाहीत?

समोर चार बाकं टाकली होती. त्यावर चार-चार माणसं बसली होती. ती छताकडे पाहात होती. ती एकत्र बसली होती खरी, पण त्यांना कुणालाच कुणाशी काहीही बोलायचं नव्हतं. या जगात घडणाऱ्या घटनांशी त्यांचा काहीएक लागाबांधा नव्हता. ती माणसं अशी का बसली होती हे खुद्द त्यांना तरी ठाऊक होतं की नाही कोण जाणे?

या माणसांनी त्या मुलांशी का बोलू नये? त्या मुलांनी त्या बायकांना का जाब विचारू नये? त्या बायकांनी त्या वृद्धेची जबाबदारी का घेऊ नये? अरे प्रश्न, प्रश्न, प्रश्न ! उत्तरं नाहीत.

मी त्या सगळ्या प्रश्नांच्या मध्ये उभी होते. पुढे आणखी दालनं होती. पण तिथे जायचं मला धाडसच नव्हतं. मी फक्त इथून कसं पळून जावं याचाच विचार करत होते. मला या सगळ्यांतून सुटका हवी होती.

आणि त्यांना-त्यांना आणि त्यांनाही सुटका हवी होती ना? आठला पाच मिनिटं कमी होती. आता आठ वाजता आया येणार होती. पुढचं दार बंद करणार होती. गुरखा दरवाजाशी राखण करणार होता. त्याआधी मला निसटायचं होतं.

मागच्या बाजूला मला एक छोटासा जिना दिसला. चोर दरवाजाची खिट्टी उघडून मी वेगानं बाहेर पडले. कवितेतलं वेळूचं बन मागे पडलं होतं. समस्यांनी घेरलेला तो बंगला हळूहळू नजरेआड होत होता. गटारं, ओसाड माळरानं, खाच-खळगे सगळं तुडवत मी माझ्या जगाकडे धावत चालले होते.

पुढच्या महिन्यात होणाऱ्या विश्व संमेलनात मला ही कथा पाठवायची होती. कसली? प्रश्न मांडणारी कथा; उत्तरं मागणारी कथा !

'वेळूचं बन ओलांडून पुढे गेल्यावर एक लालचुटूक कौलारू घर लागतं. तिथं जाळणारी भूक स्त्रीरूप धारण करून झोपली आहे. स्त्रियांचा एक जथा, राजकीय जनजागरण करतो आहे. बेकार तरुण जगण्याचा मार्ग शोधतायत आणि म्हातारी माणसं छतावरची जळमटं पाहात बसण्यासाठी बाकावर आपला हक्क प्रस्थापित करताहेत...'

पण या कथेत मी दोन प्रश्न मांडणार आहे, ते असे १) या सर्वांना आहे त्या स्थितीत टाकून मी चोर दरवाजानं का पळून गेले? २) वेळूच्या बनात आता कृष्ण कन्हैया का दिसत नाही? तुम्ही देऊ शकाल उत्तर?

✦ ✦



# १० मे, १९६८

शर्मिला पुंगलिया या नावाचं मला अपस्मारी वेड लागलं होतं. अहो नावच मोठं चमत्कारिक. या नावावरून रंग-रूप-जात-पात कश्शा कश्शाचा बोध होत नव्हता. आता कसं, थिटे, कापशे, गुळगुळे ही नावं सुटकन जिभेवरून खाली घसरतात. पण राजर्षी, अग्निहोत्री अशी नावं ऐकली की आपल्यालाच कसं भारदस्त झाल्यासारखं वाटतं. मग भले तो माणूस किती का फाटका असेना ! आपण आपले डोळे मोठे मोठे करून म्हणतो, 'हे अग्निहोत्री बरं का !'

पण पुंगलिया या नावानं कसलाच अर्थबोध होत नव्हता. 'अफाट' एवढ्या एकाच शब्दात तिचं वर्णन करता आलं असतं. ती बाईही तशीच होती. तशी ती दिसायला बरी होती बरं का ! ठेंगणी ठुसकीच, पण जिथल्या तिथं म्हणता येईल अशी. किंचित आडवा बांधा, उंची कपडे, भडक मेकअप, मोजकेच पण ठसठशीत दागिने आणि स्लीवलेसमधून दिसणारा गोरापान बाहू !

संध्याकाळचे सहा-साडेसहा वाजले की, तिची 'कॅडिलॅक' पूना कॉफी हाऊस समोर येऊन उभी राहायची. गाडी पाहून पूना कॉफीमध्ये बसलेल्यांची कुजबूज सुरू व्हायची. तरुण मुलांचे श्वास कॉफीच्या वाफेबरोबर अधांतरीच तरंगत राहायचे.

शर्मिला पुंगलिया हे सगळं नजरेनं झेलायची. एक हात चाकावर आणि दुसरा हात मानेमागे किंचित उचलल्यासारखा ठेवून ऐटीत पाहात राहायची. पूना कॉफीतली मुलं त्या गोऱ्यापान बाहूंकडे टकाटका पाहायची. कॅडिलॅक पाहिली की समोरच्या फुटपाथवरची गजरे विकणारी मुलं 'मोतीया, मोतीया' असं ओरडत धावत यायची. पुढे केलेल्या गजऱ्यातले तीन-चार गजरे ती चटकन् उचलायची. पर्स उघडून हाताला लागेल ती नोट सहज समोर धरायची. कधी दोन रुपयांची, कधी पाचची, तर कधी दहाचीसुद्धा ! मोतीयावाला उगाचच खुळूखुळू करून मोड शोधायचा. ती डाव्या हातानंच, 'राहू दे' अशी खूण करायची आणि जशी ऐटीत आली तशीच दिमाखात, नजरांचे मानाचे मुजरे घेत घेत झर्रऽऽकन निघून जायची. पूना कॉफी हाऊसमधल्या मुलांचे अडकलेले श्वास खाली यायचे. नजरा पुढे गेलेल्या मोटारीमागे धावायच्या.

कधी कधी तिची गाडी तुळशीबागेशी दिसायची. गाडी दिसली की चांगल्या गोठ-पाटल्यातल्या बायका वळून वळून बघायच्या. आपसात कुजबुजायच्या,

'पाहिलंत?'

'काय ते?'

'दागिने ! खरे असतील?'

'खरे न् खोटे. कळतंय काय आपल्याला त्यातलं? दोन आण्यांची मिरची कोथिंबीर आणि चार आण्यांचा पालक यात जल्म गेला आपला. तुळशीबाग ते नारायण पेठ हे आपलं जग. बाकी दिसताय बरिक सुरेख हो !'

हे आणि असलं बोलणं ऐकण्यासाठीच तिची गाडी थांबलेली असायची. ते ऐकलं की ती हसत हसत गाडी सुरू करायची.

शर्मिला पुंगलिया तशी पुण्यात नवीनच होती. आता आता कुठे तिची गाडी पुण्याच्या रस्त्यावर धावायला लागली होती. ती फारशी कुणात मिसळायची नाही. राहायची झकपक, त्यामुळे ती कोण आहे हेही कळायचं नाही. काहीबाही नोकरा-चाकरांकडून कानावर यायचं तेवढंच. गावाबाहेर तिचा सुरेख बंगला होता. नवऱ्याचा नायजेरियाकडे काहीतरी हिऱ्या-मोत्यांचा व्यापार होता म्हणे. सगळ्या सांगोवांगीच्या गोष्टी. तशी ती कुणात मिसळायची नाही. आपला बंगला, दोन देखणी मुलं आणि ऐटबाज गाडी यात ती मस्त असायची.

तर अशी ही शर्मिला पुंगलिया ! माझ्यासारख्या दरिद्री लेखिकेच्या आयुष्यात कधी येण्याची शक्यता तरी होती का? काही कारणच नव्हतं. पण, तशीही वेळ



आली. त्याचं काय झालं – एक दिवस सकाळी केसांची बुचडी बांधून मी केर-वारे करत होते. एवढ्यात दारात कुणाचीशी सावली दिसली. 'कोण आहे?' म्हणत खोचलेला पदर अंगासरशी करत मी पुढे आले. दारात पट्टेवाला. लेखनाशी जोडलेल्या आमच्यासारख्या माणसांना पट्टेवाला ही चीज तशी नवी नव्हे पण, हा पट्टेवाला जरा वेगळा होता. त्याला 'आत या' म्हणावं की नाही हा मला प्रश्नच पडला. कारण त्याचे कपडे इतके स्वच्छ होते की, माझ्याच खुर्चीची धूळ त्याच्या परीटघडी कपड्यांना लागेल की काय, अशी मला भीती वाटली. त्यातून माझ्या घरी एकच खुर्ची. तिचा तैमूरलंग झालेला. तेव्हा ती दारापर्यंत ओढत न्यायची म्हणजे...? अन् त्याहीपेक्षा अशा पट्टेवाल्यांना खुर्ची द्यायची असते की नाही, हाही प्रश्नच होता. त्यानं समोर धरलेलं पाकीट मी हातात घेतलं आणि नुसती मानेनंच खूण केली. पाहिजे तर त्यानं उभं राहावं नाहीतर बसावं. मी पाकिटाच्या मागच्या बाजूला पाहिलं. त्यावर लिहिलं होतं. फ्रॉम मिसेस पुंगलिया एम. ए. मिसेस पुंगलिया म्हणजे... हां ! संध्याकाळी सहा-साडेसहाची वेळ. पूना कॉफी हाऊस, कॅडिलॅक, उंची कपडे... भडक मेकअप... मोजकेच पण ठसठशीत दागिने आणि स्लीवलेसमधून दिसणारा गोरापान बाहू- वगैरे, वगैरे तपशील. झर्रऽऽदिशी माझ्या नजरेसमोर येऊन गेला. या बाईचं माझ्याकडे काय काम असावं? मी कुणी बड्या ग्रुपशी जोडलेली लेखिका नव्हे, किंवा फॅशनेबल समाज कार्यकर्ती नव्हे. मग हिचं माझ्याकडं काय काम...? विचारात अधिक वेळ न दवडता मी झर्रऽऽकन ते पाकीट फोडलं. त्यात मजकूर होता,

'मी आपलं लेखन वाचलं आहे. मला ते आवडतं. आपण माझं 'आत्मचरित्र' लिहून द्यावं अशी माझी इच्छा आहे. आपण नाही म्हणणार नाही ही अपेक्षा-'

खाली झोकदार सही केली होती आणि त्याखाली लाल शाईत टीप होती-

'पैशांची काळजी करू नये-'

पैशांची काळजी ! शर्मिला पुंगलिया, एक श्रीमान रूपगर्विता ! माझ्यासारख्या दरिद्री लेखिकेला विकत घेऊ पाहात होती. रेव्हिन्यू कॉलनीतलं दीडखणी घर माझं. दारिद्र्याला टक्कर देता देता अर्ध्या आयुष्यातून उठून गेलेली माझी आई... दम्यानं छातीचं खोकं झालेले माझे वृद्ध वडील... आणि लग्नाचं वय उलटून गेलं तरी मला लग्नच करायचं नाही असं सांगणारी मी... त्या लाल शाईतली टीप एखाद्या तापलेल्या लोखंडाच्या सळईसारखी माझ्या अंगावरून चरचरून गेली. माझं मन आणखीच

घट्टमुट्ट झालं. मी चटकन् त्याच पत्राच्या मागच्या बाजूला लिहिलं, 'मी मुलाखती घेते. इतरही लेखन करते, पण आत्मचरित्र लिहून देण्याचा धंदा मी केलेला नाही. माफ करा. मला आपल्याला असलं काही लिहून देता येणार नाही.'

बस ! खाली मीही तशीच लपेटी सही केली. मग आतून लाल शाईचं पेन आणलं आणि खाली टीप लिहिली–

'पैशावर विकत जाणारी लेखिका मी नव्हे.'

खाली पुन्हा सही केली आणि चिठ्ठी पाठवून दिली.

पट्टेवाला निघून गेला आणि मला हायसं वाटलं. मला स्वत:लाच माझा अभिमान वाटला. शर्मिला पुंगलिया मला विकत घेऊ पाहात होती आणि मी तिला सणसणीत उत्तर देऊन मोकळी झाले होते. माझी प्रतिष्ठा शाबूत राहिली होती. सगळेच लेखक पैशावर विकत घेता येत नाहीत हे मी तिला दाखवून दिलं होतं. माझ्या दीड खणी घरातच माझी मान हिमालयाएवढी उंच झाली होती.

या पत्रानंतर शर्मिला पुंगलिया माझ्या वाटेला जाणं शक्यच नव्हतं. पण तिला काय वाटलं असेल हे समजून घ्यायला मी मात्र उत्सुक होते आणि योगायोगानं तोच पट्टेवाला पुन्हा माझ्या दारात येऊन उभा राहिला. आता मी पहिल्यासारखी बावचळले नाही. सरावानं त्याच्या हातून पाकीट घेतलं, झर्रकन् फोडलं. आत मजकूर होता–

'आपलं पत्र मिळालं. आपण मुलाखती घेता हे मला माहीत आहे. आपण माझी मुलाखत घ्याल? मला बरं वाटेल. मी आपल्या उत्तराची वाट पाहते.'

आता पत्रात नम्रता होती. लेखणी खाली वाकली होती. खाली निळ्याच शाईत टीप होती.

'आपल्या सोईसाठी माझी कार पाठवून देऊ?'

मी लगेच उत्तर लिहायला घेतलं. आता हा पट्टेवाला पुन्हा येणार नाही याची मला खात्री होती. तुमच्यासारख्यांनी विचारलंच तर दाखवायला हे पत्र असावं म्हणून ते उचलून आत ठेवलं आणि दुसऱ्या कागदावर लिहिलं.

'मी मुलाखती जरूर घेते, पण मुलाखत घेण्यासारखं त्या व्यक्तीत काही विशेष असेल तर ! इतर चार-चौघींपेक्षा तुम्ही काही कर्तृत्व गाजवलं असेल तर मला मुलाखत घ्यायला आवडेल. रूप किंवा पैसा बघून मुलाखत घेणारी मी नव्हे.'

खाली मी सही केली आणि निळ्याच शाईत टीप लिहिली, 'कार पाठवण्याची तसदी घेऊ नये.'



हे पत्र पाठवलं आणि मी निर्धास्त झाले. शर्मिला पुंगलियाचा नि माझा संबंध संपल्यासारखा झाला होता. आता मी तिला विसरून गेले होते. मन कामात गुंतलं होतं.

माझं पहिलं पुस्तक निघायचं होतं. प्रकाशकांशी बोलणी झाली होती. कुठल्याही पहिल्यावहिल्याची गोडी विशेष असते हे सांगायलाच नको. मी मोठ्या खुशीत स्वत:शीच विचार करत चालले होते. पूना कॉफीजवळ आले आणि माझी पावलं अडखळली. मनात आलं, एखाद दिवस आपण एन्जॉय का करू नये? चटकन् पाकीट उघडलं आणि पैशांचा अंदाज घेतला. चक्क पस्तीस पैसे. म्हटलं, अर्धा कप कॉफी घ्यायला काय हरकत आहे? लोकांना थोडंच कळणार आहे आपल्या पाकिटात किती पैसे आहेत ते ! मी लगेच पूना कॉफीत शिरले. कोपऱ्यातली खुर्ची पटकावली आणि अशा ऐटीत ऑर्डर दिली की, जसं काही अख्खं पूना कॉफी हाऊस मी विकत घेणार होते. मी सुखावले होते, नव्या कल्पनांत मग्न होते. एवढ्यात पाठीमागून कुणाचीशी हाक ऐकू आली, 'बाईसाहेब' मी दचकून मागं बघितलं. या आख्ख्या पुण्यात एक तरी माणूस मला बाईसाहेब म्हणणारं आहे तर ! मी अक्षरश: जागची उडाले. तोच तो पट्टेवाला, अदबीनं उभा होता आणि सांगत होता, 'मेमसाब बोलवित्यात.' मी त्याच्या हाताच्या दिशेनं पाहिलं. कॅडिलॅकमधून गौर गुलाबी हात मला 'हाय'ची सलामी देत होता. मी चटकन् उठलेच. कधी नव्हे तो मनात विचार येऊन गेला. आज आपण फार गबाळ्या पोषाखात तर नाही? माझी पर्स, डायरी आणि या क्षणी कसा कुणास ठाऊक, आलेला वेंधळेपणा सावरत सावरत पुंगलियाच्या समोर गेले. नमस्कार करण्यासाठी हात उचलले मात्र आणि नेमकं जे व्हायला नको होतं तेच झालं. हातातली डायरी निसटून खाली पडली. पट्टेवाल्यानं ती उचलून माझ्या पुढे केली. आता मला प्रश्न पडला, त्याला 'थँक्यू' म्हणावं का तिला 'सॉरी' म्हणावं. का तिला 'थँक्यू' म्हणावं आणि त्याला 'सॉरी' म्हणावं? या गडबडीत मी काहीच केलं नाही. फक्त ओशाळवाणं बुळबुळीत हसले. तिनं मला नजरेनं तोललं. म्हणाली, 'अरे या ना ! तुम्ही बड्या लेखिका ! कधीतरी तुमचा सहवास आम्हाला द्या की !' तिच्या शब्दानं मी ढेकळासारखी विरघळले आणि उघड्या दरवाजातून सरळ तिच्या शेजारी जाऊन बसले.

बसल्या बसल्या कसलातरी मंद सुगंध मला भोवंडून गेला. हा नेहमीचा मध्यमवर्गीय छाप, ओ द कोलन नव्हता. काहीतरी वेगळा, कदाचित तिच्या